महाराष्ट्र टाइम्स, मुंबई

# बुलियन ऑनलाइन ट्रेडिंगची सुविधा

**म. टा. व्यापार प्रतिनिधी**

रिद्धीसिद्धी बुलियन्सने सुवर्णकारांसाठी ईट्रेडिंगची सुविधा उपलब्ध केली आहे. 'आरएसबीएल स्पॉट' नावाने ती ओळखली जाईल.

कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक पृथ्वीराज कोठारी यांनी दिलेल्या माहितीनुसार सोनेचांदी बाजारातील मौल्यवान धातू प्रत्यक्ष हाताळण्याच्या पारंपरिक पद्धतीस ईट्रेडिंग अधिक कार्यक्षम आणि सुलभ पद्धत ठरेल. तसेच छोटा सुवर्णकार प्रती ग्रॅम पाच रुपयांची बचत करू शकेल आणि वर्षाला एका टनामागे ५० लाख रुपये वाचतील.

सोनेचांदी बाजारात दागिन बनविण्यासाठी ६०० टनांची उलाढाल होत असल्याने ३०० कोटी रुपये वाचणार आहेत.

ईट्रेडिंग प्लॅटफॉर्ममुळे सोन्याचांदीचे आंतरराष्ट्रीय भाव ऑनलाइनद्वारे मिळतील आणि या भावात होणारे छोटेमोठे चढउतारही सहज समजू शकतील आणि ते सर्वांनाच एकाच वेळी समजणार असल्याने देशभर सारखे भाव राहण्यास मदत होईल. ऑनलाइनवरून सौदे केल्यानंतर दोन दिवसांनी डिलिव्हरी घ्यावी लागणार आहे. सट्टेबाजीस वाव राहणार नाही. सध्या १०० ग्रॅम (०.९९९) आणि एक किलो (०.९९५) सोन्याची तसेच ३० किलो (०.९९९) चांदीची डिलिव्हरी मुंबई, अहमदाबाद, हैदराबाद येथे मिळू शकेल, असे त्यांनी पुढे सांगितले.

यासंबंधी अधिक माहिती www.rsbl.co.in या वेबसाइटवर किंवा मोबाइल ९३२३९ ७८९६१ मिळू शकेल.